# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०७/२०१८

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन लोखंडी विळा घेवुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक २५/०७/२०१८ चे २०.०० ते २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस दारु पिण्या करीता पैसे दे! असे बोलुन पाहुण घेण्याची धमकी दिली व आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन दारु पाणी पिवुन फिर्यादीचे घरी जावुन दाराला लाथ मारुन घराच्या बाहेर निघुन व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन हातात लोखंडी विळा घेवुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी प्रदीप मोरेश्वर रामटेके वय २६ वर्ष, रा. मांगली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,२९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे यांचे तोंडी रिपोर्ट वरून स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) लाकडी दांडयाने मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक ०८/०७/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे शेतात जात असतांनी यातील आरोपीने विनाकारण तुझा धुरा उपळुन फेकतो! असे बोलुन तोंडातोंडी भांडण व शिवीगाळ करुन लाखडी दांडयाने फिर्यादीचे उजवे हातावर, कमरेवर, पायावर मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी ताराचंद परसराम जुबळे वय ६० वर्ष रा. कोंढा यांचे तोंडी व डॉ. एक्सरे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२५,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) मारोती ओमनीच्या धडकेत एक जखमी : —**

दिनांक २६/०७/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्याची हिरोहोन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३१ बी एन ५४८२ ने भंडारा कडून साकोली कडे एनएच ०६ रोडने साकोली कडे जात असतांना आदर्श नगर लाखनी मानेगाव रोडवर यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती ओमनी गाडी हयगयीने, निष्काळजीपने विरुध्द दिशेने चालवुन फिर्यादी जखमीच्या मोटार सायकलला धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी फिर्यादी महेन्द्र जनार्धन शहारे वय ३७ वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे बयान व डॉ. परिक्षण अहवालावरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४, २ आर. आर/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी : —**

दिनांक २६/०७/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याच्या भावाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ८९९५ किंमती १५,०००/—रु. ची पॅशन प्रो हिरो कंम्पनीची काळया निळया पटया असलेली मोटार सायकल अर्पाच्युनिटी क्लासेस समोर रोडचे कडेला लावुन क्लासेस करुन परत आले असता मोटार सायकल न दिसल्याने आजुबाजुला शोध घेतला असता दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी नितीन राजेन्द्र बुराडे वय १९ वर्ष रा. खापा तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) शेतातील लोखंडी पाईप नाल्याचे पाण्यात लपवुन ठेवल्याचे मिळुन आल्याने गुन्हा नोंद : —**

जानेवारी २०१८ ते आज पावेतो यातील फिर्यादीचे शेतातील धुऱ्यावर गाढुन ठेवलेला लोखंडी पाईप किंमती ३,०००/—रु. चा यातील संशयीत आरोपीने सरकारी नाल्याचे पाण्यात लपवुन ठेवल्याने फिर्यादी चंद्रकांत यशंवत हटनागर वय ५३ वर्ष, रा. पोहरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) क्षुल्लक कारणावरुन कुऱ्हाडीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २६/०७/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी तुलसीदास गजीराम वल्के वय ४० वर्ष, रा. केसलवाडा पवार याने आरोपीस घरी राहुन कोणताही कामधंदा करीत नाहीस'' करीता बोलुन घरच्या म्हशी चारण्याकरीता घेवुन जा' असे सांगीतले वरुन आरोपीने फिर्यादीस वाईट शिवीगाळ करुन कुऱ्हाडीचे मुठीने उजव्या गालावर मारुन जखमी केले असे फिर्यादी यांचे बयाण व वैद्यकीय परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी/देशी दारू / जुगार अड्डयावर धाडी . :–**

दिनांक २६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन मोहाडी, आंधळगाव व लाखनी येथे अवैध हातभट्टी, देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १४५ लिटर हा.भ. दारू + २ मोटार सायकल किंमती ६०,५००/रु व १ लिटर ८०० मिलीलीटर देशी किमती ५००/रु. तसेच जगारातुन १२७८/रु. असा एकुण ६२,२७८ /रु चा माल जप्त करण्यात आला.

detail

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३ तीन सिटर वाहनाकरीता– १० ईतर वाहनांवरती – ८८ केसेस करण्यात आले आहे.

**(पोउपनी.जे.के.आडोळे)**
**जनसंपर्क अधिकारी**
**दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.